**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित**
**ग्राहक तक्रार निवारण मंच**
**कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर यांचे समोर**

ग्राहक तक्रार क्र. २९–०९/ दिनांक :

श्री. हणमंत दुंडाप्पा शिंगे,
रा. मुचंडी, ता. जत, जि. सांगली अर्जदार

**विरुध्द**

१) कार्यकारी अभियंता (का.) तथा नोडल ऑफीसर,
म.रा.वि.वितरण कं.लि.,संवसु मंडळ कार्यालय,
मंडल कार्यालय, विश्रामबाग, सांगली विरुध्द पक्षकार

२) कार्यकारी अभियंता
म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,
विभागीय कार्यालय, कवठे महांकाळ, जि. सांगली

३) सहाय्यक अभियंता,
म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,
उप विभागीय कार्यालय, संख, जि. सांगली

**कोरम :–** १) श्री. के.वाय. जगताप, अध्यक्ष,
२) श्री. एस.आर. बांबळे, सदस्य–सचिव
३) श्री. जी.सी. लेले, सदस्य

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

## न्याय निर्णय

श्री. एस.आर.बांबळे, सदस्य सचिव, ग्रा.त.नि.मंच यांचे तर्फे          दिनांक : ११.०५.२००९

श्री. हनमंत दंडाप्पा शिंगे, रा. मुचंडी, ता. जत, जि. सांगली यांचे तक्रार प्रकरण क्र. २९/०९ यांनी त्यांचे तेथील शेतीपंप कनेक्शनला वीज मीटर बसवून मीटर पध्दतीने बील मिळावे अशी वि.प.कडे मागणी केली आहे. अद्याप मीटर बसविला नाही अशी तक्रार आहे.

तक्रारदार यांनी अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली यांजकडे प्रकरण क्र. ७२१ दि. १८.१२.२००८ ने क्ष नमुना अर्जात तक्रार दाखल केली होती. त्याबाबत कक्षात सुनावणी होवून आदेश क्र. १७५९ दि. २४.२.२००९ ने कक्षाने निर्णय दिला. त्याची अंमजबजावणी झाली नसलेने, ग्राहक तक्रार निवारण मंच, कोल्हापूर यांजकडे दि. १५.४.२००९ रोजी अपील दखल केले आहे. त्यावर मंचाने संबंधितांकडून मुद्देनिहाय अहवाल मागविला व दि. ५.५.२००९ रोजी सुनावणी सांगली येथे ठेवली.

सुनावणीवेळी तक्रारदार किंवा प्रतिनिधी हजर नव्हते. वि.प.तर्फे श्री. बी.बी. भोसले व श्री. कुलकर्णी, कनिष्ठ अभियंता, कवठे महांकाळ विभाग व श्री. दिवटे, सहाय्यक अभियंता, संख उप विभाग इ. हजर होते.

### तक्रारदाराची तक्रार

तक्रारदार यांचे मुचंडी, ता. जत, जि. सागली येथे शेतीपंप जोडणी आहे. सदर जोडणीस वीज मीटर बसवून मिळावा व यापुढे वीज बील मीटर प्रमाणे यावे अशी मागणी केली. कार्यकारी अभियंता, वितरण कंपनी यांनी खोटा अहवाल सादर करुन मीटर न बसविता तो बसविला असलेचे कळवून तक्रार निवारण झालेचे कळविले आहे. एस.ओ.पी.प्रमाणे मीटर बसवून वीज बील मिळावे किंवा नुकसान भरपाई मिळावी.

### वितरण कंपनीचे म्हणणे

तक्रारदार यांचे शेतीपंप वीज जोडणीस मीटर बसविणेचे मागणीवर वि.प.ने सांगितले कि ग्राहकाचे शेतीपंप वीज जोडणीला दि. १०.१.२००९ रोजी मीटर बाजूला बसविले, कारण तक्रारदार यांची मीटर करीता बसविलेली पेटी लहान होती व वायरींग व्यवस्थित नव्हते. तक्रारदार यांनी दि. ३.४.२००९ रोजी वायरींग व मीटर पेटी व्यवस्थित करुन दिलेवर मीटर जोडण्यात आले. तक्रारदार यांनी तसे लेखी निवेदन दिले आहे. त्याची प्रत मंचाला सादर करण्यात आली.

### सदस्य सचिव यांचा निष्कर्ष

तक्रारदार यांचे शेतीपंपास वीज मीटर बसवून त्यास मीटर पध्दतीने वीज बील मिळावे हि मागणी आहे. ग्राहकाने मीटरसाठी बसविलेली पेटी लहान असलेने व वायरींग ठिक नसलेमुळे मीटर पेटीचे बाजूस बसविलेचे वि.प.ने व ग्राहकाचे लेखी निवेदनात नमूद केले आहे. तक्रारदार यांनी दि. ३.४.२००९ रोजी वायरींग व पेटी व्यवस्थित करुन दिलेवर मीटर जोडण्यात आले व तक्रार निवारण झाले आहे. तक्रारदाराची एसओपी नुसार कनेक्शनला मीटर बसविणेची कार्यवाही करावी किंवा नुकसान भरपाई मिळावी अशी मागणी आहे. वि.प.ने कार्यवाही केली असलेने, नुकसान भरपाईचा मुद्दा निकालात निघतो. तसेच तक्ररदार याने त्याची कांही तक्रार राहिली नाही असेही लिहून दिले आहे.

दोन्ही बाजूंचे म्हणणे, युक्तीवाद, उपलब्ध कागदपत्रे इ. विचारांत घेवून सदस्य सचिव यांजकडून खालील प्रमाणे आदेश देणेत येत आहेत.

## <u>आदेश</u>

१)  तक्रारदाराचे अपील फेटाळणेत येत आहे.

२)  भरपाईचा आदेश नाही.

३)  या निर्णयाविरूध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा, बांद्रा–कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई–५१ यांजकडे करता येईल.

दिनांक : ११.०५.२००९  ( एस. आर. बांबळे )
सदस्य सचिव

श्री. काकासाहेब य. जगताप, अध्यक्ष :

श्री. जी. सी. लेले, ग्राहक सदस्य :